प. १२५

**तातडीचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र
क्र.नासुकें/१/कावि/३४५/२०१७
दिनांक : २२/०९/२०१७.

**विषय :- Online RTI ची जनजागृती करणे व RTI कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत...**

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासनाचे अधिकृत वेबपोर्टल आपले सरकार वर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दि.२६/०१/२०१६ पासून Online RTI ही सेवा महाराष्ट्र शासनामार्फत सुरू करणेत आली असून ही सुविधा महानगरपालिकेमार्फत कार्यान्वित आहे.

महाराष्ट्र शासनाकडील पत्र क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.१२९/का.सहा. दि.०३/०८/२०१७ व क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.२३/नवि.२९ दि.३१/०८/२०१७ अन्वये Online RTI ही सुविधा https://rtionline.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याबाबत मनपाच्या सर्व विभागांना अवगत करुन वृत्तपत्रामध्ये आवश्यक ती प्रसिद्धी करणेबाबत व सर्व शासकीय कार्यालयामध्ये याबाबतचे फलकही दर्शनी भागावर लावणेसंबंधी शासनाने कळविले आहे. सोबत सदर पत्राची छायांकित प्रत पाठविणेत येत आहे.

तथापि, राज्य माहिती आयोगाच्या कार्यालयात Online Second Appeal सुविधा कार्यान्वित झाली असून आता नागरिकांना व्दितीय अपील Online करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून सदर सुविधा https://sic.maharashtra.gov.in/siconline या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली आहे.

तसेच, महानगरपालिकेच्या माहिती अधिकार संबंधी काही महत्वाच्या बाबींची पूर्तता करणेसंबंधी मा.राज्य माहिती आयुक्त यांनी यापूर्वीच पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत.

- माहिती अधिकार अधिनियमान्वये प्रसिध्द करावयाची नागरिकांची सनद अद्यावत नाही, ती प्राधान्याने अद्ययावत करुन प्रत्येक अनुवर्ती वर्षाच्या २ मे रोजी अद्यावत करणेबाबत दक्षता घ्यावी.
- नागरिकांची सनद मनपाच्या वेबपोर्टलवर जी प्रसिद्ध करण्यात आली आहे त्यामध्ये सर्व विभागांची माहिती उपलब्ध नाही. मुख्य विभाग तथा त्यांचे अधिपत्याखालील उपविभाग कार्यालये यांची स्वतंत्र माहिती प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.
- प्रत्येक विभागाचे जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रशासकीय बदलीमुळे अथवा निवृत्तीमुळे होणारे बदल वेळचे वेळी अद्ययावत करावेत व तसे नागरी सुविधा केंद्र विभागास अवगत करावे.
- प्रत्येक विभागाने जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे नावाचा फलक दर्शनी भागावर प्रसिद्ध करावा.
- माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम ४(१)(ख) मधील १७ मुद्यांची माहिती अद्ययावत नाही ती त्वरीत अद्ययावत करुन मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी.

- माहे ऑगस्ट २०१७ अखेर पर्यंत माहिती अधिकारातील प्रकरणे व अपिलात गेलेली प्रकरणे मोठ्या प्रमाणामध्ये प्रलंबित आहेत. सदर प्रकरणे त्वरीत निकाली काढणेत यावीत.
- माहिती अधिकारात अर्जदाराने मागितलेली माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन अर्जदार अपिलात जाणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी.
- माहिती अर्ज / प्रथम अपील अर्ज अपूर्ण पदनाम अथवा इतर विभागाशी संबंधित असणे इ. कारणास्तव न नाकारता तो स्विकारुन आवश्यकतेनुसार योग्य त्या अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत वर्ग करणेबाबत दक्षता घ्यावी.
- महानगरपालिकेने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज स्विकृतीकामी संगणक प्रणाली विकसित करुन देखील लेखी स्वरुपातील अर्जांची नोंद या संगणक प्रणाली मध्ये घेतली जात नसलेचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्या त्या विभागाने त्वरीत सदर लेखी स्वरुपात प्राप्त झालेले अर्ज माहिती अधिकार संगणक प्रणालीमध्ये नोंदविणे आवश्यक आहे. जेणेकरुन सदर संगणक प्रणालीमधून माहिती अधिकार मासिक गोषवारा प्राप्त करुन शासनास मुदतीत सादर करणे सहज शक्य होईल. लेखी स्वरुपातील अर्जांची नोंद संगणक प्रणाली मध्ये घेतली नसल्यास संबंधित जनमाहिती अधिकारी / संबंधित विभागप्रमुखांना जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.
- यापुढे माहिती अधिकार मासिक गोषवारा लेखी स्वरुपात सादर करणेची पद्धती बंद करणेत येणार असून संगणक प्रणालीव्दारे मासिक गोषवारा घेणेत येणार आहे.
- मासिक गोषवारा दरमहा शासनास पाठविणेत येत असून संबंधित विभागाने संगणक प्रणालीव्दारे माहिती अधिकार अर्जांची नोंद घेतली नसल्यास सदर विभागाची मासिक आकडेवारी चुकीची प्राप्त होईल व यासाठी संबंधित जनमाहिती अधिकाऱ्यास / विभागप्रमुखास जबाबदार धरणेत येईल याची संबंधितांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख, सर्व जनमाहिती अधिकारी आणि सर्व अपिलीय अधिकारी यांना सूचित करणेत येते की, महाराष्ट्र शासनाकडील दि.०३/०८/२०१७ व दि.३१/०८/२०१७ रोजीच्या पत्रात नमूद केले प्रमाणे आणि मा.राज्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. अन्यथा संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणेत येईल.

**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

सोबत :- शासनाकडील वरील नमूद पत्र

प्रति,

सर्व विभागप्रमुख,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

२/- प्रस्तुतचे परिपत्रक आपल्या नियंत्रणाखालील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणून द्यावे.